International Journal of Sanskrit Research 2019; 5(2): 22-30

International Journal of Sanskrit Research

अनन्ता

ISSN: 2394-7519
IJSR 2019; 5(2): 22-30
© 2019 IJSR
www.anantaajournal.com
Received: 17-01-2019
Accepted: 22-02-2019

**महेश श्रीकांत क्षिरसागर**
जिल्हा समन्वयक, समावेशित
शिक्षण विभाग, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत

**Correspondence**
**महेश श्रीकांत क्षिरसागर**
जिल्हा समन्वयक, समावेशित
शिक्षण विभाग, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत

# स्त्री पुरूष समानता मुल्य रूजविण्याकरता संप्रेषण साहित्याची निर्मिती व परिणाम कारकतेचा अभ्यास

**महेश श्रीकांत क्षिरसागर**

**प्रस्तावना**

आजच्या 21व्या शतकात समाजाची उंची समाजातील शिक्षणावर अवलंबुन असते आणि शिक्षणाची उंची शिक्षकांचा बैध्दीक उंचीवर अवलबुन असते हे जसे खरे तसे समाजाचा पायाभुत घटक म्हणुन मानल्या गेलेल्या कुंटुबाची उंची त्या घरातील स्त्रीच्या उंचीवर अवलबून असते. जीच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उधारी हे वचन तर प्रसीदध आहे मुले शाळेमध्ये शिक्षकांच्या सहवासात जेवढे असतात त्या पेक्षा अधिकाळ ते आपल्या कुंटुबात असतात. आईचा सहवास पर्यायाने त्यांना त्याचा विकसनशील व संस्कार क्षम वयात अधीक मिळत असता सहाजीकच संस्कार करण्याची क्षमता आई मध्ये अधिक असते म्हणूनच विनोबा भावेनी

``मात्रु हस्तेन भोजन म मात्रु मुखन शिक्षणम' '

असे म्हटले आहे प्रसीदध समाजावादी शास्त्रज्ञ चार्ल्स फरीअर याने असे म्हटले आहे की एखादया राष्ट्राकडून स्त्रीयंना दिल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकीय महत्वावरून त्या राष्ट्राची सांस्कृतीक उंची मोजता येते राष्ट्राच्या विकासात स्त्री शिक्षणाला अतिशय महत्व आहे. स्त्री शिक्षणाच्या संदर्भात लेनीन चे विचार सुधा श्रेष्ठ होते. रशियाच्या विकासात व साक्षरतेत झालेल्या प्रगतीमधील श्रेयाचे कारण स्त्रीचे आहे.

महात्मा ज्योतीबा फुले यांनी राष्ट्र विकासात स्त्री शिक्षणाचे महत्व ओळखून आपले लक्ष प्रथम:तहा स्त्री शिक्षणाकडे केंन्द्रीत केले होते. महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाचा श्री गणेशाकरून एक मोठे समाजीक परिवर्तन घडवून आणले होते.

लोकशाही विचार प्रणाली स्वीकारलेल्या देशात स्त्री शिक्षणाचे महत्व विशेष आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्ती सुशिक्षीत सुजान व संस्कृत असणे गरजेचे असते. देशामध्ये घडणाऱ्या विविध घटनाच्या त्यांना अर्थ लावता आला पाहिजे त्या घटनेसंबंधी आपले मत बनविता आले पाहिजे असे न झाल्यास लोकशाहीने प्रधान केलेल्या मतदानाच्या हक्क फारसा अर्थ पुर्ण ठरणार नाही समाजातील हे चित्र बदलयाचे असेल तर स्त्री सुशिक्षीत होऊन जागृत होते अंत्यत

आवश्यक आहे. यासाठी स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रचार होणे आवश्यक आहे. स्त्री शिक्षणाच्या बाबतीत पंडीत नेहरूनी असे म्हटले आहे की जर तुम्ही एका मुलीला शिकविले तर एका व्यक्तीला साक्षर केल्या सारखे होईल पंरतू जेव्हा तुम्ही एका मुलीला शिकवाल तेव्हा सर्व कुंटुबाला सुशिक्षित केल्या सारखे होईल. एका स्त्री कुंटुबामध्ये विविध भुमिकातीला पार पाडत असते पत्नी माता अशा भुमिका तीला वाढवावया लागतात कुंटुबात पतिला साथ देउन मार्गदर्शन करण्यासाठी व बालकांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी स्त्री शिक्षण अतिशय महत्व आहे.

**शिक्षणाची समानसंधी –**

आपल्या राज्य घटनेनुसार सर्व स्त्री-पुरूषांनी समान हक्क दिलेल्या आहेत समाजातील सर्व स्त्री-पुरूषांना समान वागणुक तसेच कायदयाचे समान संरक्षण दिल्याले आहे. सरकारी नौकरीच्या बाबतीत समान संधी दिलेली आहे. पंरतू समाजातील रूढी पंरपरा अंधश्रदधा यामुळे स्त्रीयाकडे पाहणाच्या दृष्टीकोन विशिष्ट स्वरूपाचा आहे त्यामुळे स्त्रीयांना गउन स्थान प्राप्त होते समाजात स्त्रीयांना समानसंधी प्राप्त करून देण्यासाठी शिक्षणाच्या प्रसार करून स्त्रीयांना आपल्या हक्काची व कर्तव्याची जाणीव होणे गरजेचे आहे स्त्री- पुरूष समानतेसाठी मुंलीना शिकविणे तीला समान संधी देणे पुरूषाच्या बरोबरीने विकास प्रकियेत सहभागी करून घेणे या बाबतीत सर्व साधारणपणे प्रचलीत असल्याने गइर समज दूर होणे आवश्यक आहेत.

**प्राचीन भारतातील शिक्षणाची समानसंधी–**

प्राचीन भारतात स्त्री शिक्षणाचे स्वरूप उज्वल होते वेदकाळामध्ये स्त्रीया पुरूषाबरोबर शिक्षण घेत असत उपनयन विधी मुलीसाठी सुदधा होते त्या काळात स्त्रीया केवळ वेदाच्या अभ्यास करत होत्या असे नव्हते तर काही स्त्रीयांनी वेद सुकतेही रचले होते त्याकाळात काही विदवान स्त्रीया वेद अध्यानात पारगत होत्या.

उदा- गारगी, मैत्रेई, ओवा, लोपमुद्रा, रामेशा, उर्वशी इ त्या कालखंडामध्ये पतीच्या गरहजेरीमध्ये पत्नी अग्नीला आहूती देउ शकत होती म्हणजेच तीला वेद सुकते पाठ असली पाहिजेत.

प्राचीन भारतामध्ये स्त्रीयाच्या सामाजिक दर्जा उच्च प्रतिच्या होता त्यांना पुरूषाप्रमाणे शैक्षणीक संधी होती गुरूकुल पदधती किंवा आश्रमा मध्ये वयाच्या 8 व्या वर्षी मुलांच्या उपनयन संस्कार होत असे विदयार्थी दशेत योग्य अध्ययन केल्या नंतरच मुलगी विवाहास पात्र ठरत होती असा पुरावा अर्थवेदात सापडतो. उपनयन संस्कारा नंतर वेद अध्ययनास सुरूवात होत असे ज्ञानाच्या सर्व शाखेत स्त्रियांना प्रवेश मिळत होता तसेच धार्मिक व तात्विक पर्याय ही स्त्री यास भागो होत होत्या.गारगी, मैत्राय या सारख्या स्त्रीं यांनी त्याकाळात वेदाच्या संखोल अभ्यास केल्याने समाजात त्यांना बहुमान प्राप्त झाला होता प्रचीन काळात ज्या मुलीना अविवाहीत राहून ज्ञानार्जन कराव्याचे असेल त्यांना (ब्रम्हवादींनी) असे म्हणत अशा ब्रम्हवादीनी स्त्रीया निरनिराळया ऋषीच्या आश्रमात राहून ज्ञानार्जन व तपचर्या करीत असे.

**समान संधी अधोगतीचा काळ (मध्ययुगीन कालखंड) –**

स्त्रीयांना मिळणारे स्वांतत्र्य समाजातील मान वेद काळानंतर राजकीय सामाजीक व आर्थिक बदलामुळे सपृष्ठात आले. त्यामुळे स्त्रीयाचा शिक्षणाचा समान हक्क देखील काळाच्या ओघात नष्ठ झाल्या तसेच नंतरच्या काही कालखंडात त्यांच्या संपत्ती दर्शन हक्क पती निवडण्याचा हक्क घटस्पोटाच्या हक्क नष्ठ करणारे कायदे आमलात आले. त्यातूनच सतीची चाल पडदा पदधती इत्यादी अनीष्ठ चालीरिती समाजात दृढ झाल्या अशा प्रकारे 18 व्या शतकाच्या शेवटी सामान्य स्त्रीयाचे जीवन हे घरापुर्तच मर्यादीत झाले त्यामुळेच स्त्रींयाना समाजात गउन दर्जा प्राप्त झाला पंरतू याला देखील काही स्त्रीया अपवाद होण्याच 19व्या शतकाच्या सुरूवातीस शासनाकडून स्त्रीयाच्या संदर्भात जे साक्षर झाले त्यावरून स्त्री शिक्षणाची स्थिती कशी होती हे समजून येते. स्त्रीयांनी शिक्षण घेतल्यानंतर वैध्यव प्राप्त होते. अशा स्वरूपाची अंधश्रदधा हिंदू समाजात त्या काळी दृढ झाली होती त्यामुळे श्रीमंत व जमीनदार लोकाचे काही अपवाद सोडल्यास असे म्हणता येईल की सर्व साधारण पणे मुंलीना शिक्षणाची संधी त्या काळात मिळत नव्हती.

**आधुनिक काळात स्त्री शिक्षणाची समानसंधी–**

19व्या शतकात खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणा विषय समाजात जाणीव निर्माण झाली समाज सुधारकांनी व धर्मसुधारकांनी स्त्री शिक्षणाचा जोराने पुरस्कार केला स्त्री जीवनाच्या दृष्टीने परपरागत जाचक रूढी चालीरिती कायदाने बंद करण्यात आल्या स्वतत्र्यानंतर स्त्री शिक्षणाची जबाबदारी शासनाने सर्व क्षेत्रात स्थानासमानसंधी उपलब्ध करून दिली

स्त्रीयांना शिकवा व रोजगार इ बाबत समानतेची वागणुक मिळावी हे सरकारचे धोरण असुन त्या दृष्टीने उपाय योजीले जात आहेत. देशातील जवळ जवळ निम्मी लोकसंख्या ही स्त्रीयाची आहे (1991 च्या जणगणनेनुसार) दर हजारी पुरूषामागे स्त्रीयाचे प्रमाणे 93% आहे 1991 च्या आकडेवारी नुसार देशाची साक्षरता 52.2% आहे. त्यामध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण निम्यापेक्षा कमी आहे स्त्री व पुरूष हे जग रूपी संसाराची दोन चाफे आहेत. समाजातील जबाबदाऱ्या पार करण्यासाठी व आर्थिक राजकीय व सांस्कृतीक विकासासाठी स्त्रीयांना साक्षर केले पाहिजे शिक्षणाच्या व व्यवसायाच्या सर्व क्षेत्रात स्त्रीयांना समान संधी दिली पाहिजे डॉ. राधाकृष्णन यांनी स्त्री शिक्षणाचा संदर्भात असे म्हटले आहे की (जर सर्व साधारण शिक्षण ही) स्त्री-पुरूषाना दयावयाचे असेल तर प्रथम संधी स्त्रीयांना दिली पाहिजे कारण संस्कृती संरक्षण व संवर्धन स्त्री शिक्षणामुळेच होत.

स्वातत्र्योतर काळामध्ये स्त्री शिक्षणाच्या गती मिळाली सरकार व समाज यांना स्त्री शिक्षणाचे महत्व समजले आज स्त्रीया पुरूषा पेक्षा शारिरीक व मानसिक शकतीत कमी आहेत असे कोणीही मान्य करू शकत नाही स्त्रीयांना समान संधी दिल्यामुळे शिक्षीका टंकलेखीका दुरध्वनी चालीका शिवणकाम लघुउघोग या क्षेत्रात स्त्रीयाची मजल पुढे गेली आहे आज कोणत्याही विषय शिकविणाऱ्या प्राध्यापिका आहेत कोणत्याही विषयात उच्च संशोधन करणाऱ्या महिला आहेत निरनिराळया संस्थानाचे संचालन करणाऱ्या महिला आहेत.स्त्रीयांना समान संधी मिळत असल्यामुळे भारतीय स्पर्धा परिक्षेत (MPSC/UPSC) त्या यशस्वी होउन प्रशासकीय आधिकारी बनत आहेत वकील, बॅरीस्टर, उदोजक, विद्यापीठाच्या कुलगुरू इ क्षेत्रात त्या कर्तव्य गजवीताना दिसत आहेत एकेकाळी राजकारण व समाजकारण हि दोन्ही क्षेत्र पुरूषाची होती ती ही यात स्त्रीयांनी काबीज केली आहेत.क्रिकेट, टेनीस, पोहणे, शारिरीक कसरती, कबबडी, खो-खो, अशा विविध क्रिडा क्षेत्रातही त्या सहभागी होउन परितोषीके मिळवत आहेत. गिरीया रोहन, विमानचालक विविध क्षेत्रात कुशल संचलन अशा विविध क्षेत्रामध्ये स्त्रीयांना चमकत आहेत. सैन्यमध्ये देखील महत्वाची भुमिका त्या पारपडत आहेत थोडक्यात आज सर्व क्षेत्रात आज सर्व क्षेत्रात स्त्रीया आपल्या प्रभाव पडताना दिसुन येत आहेत.

**संशोधन ध्यैय –**

- स्त्री- पुरूष समानता मुल्य जनमानसात रूजविणे.

**संशोधनाची उददीष्ट्रे**

- स्त्री-पुरूष मधील दरी कमी करणे.
- स्त्री-पुरूष समानत मुल्स रूजविण्यासाठी निर्माण केलेल्या सप्रेषण साहित्याची परिणाम कारक तपासणे.
- स्त्री-पुरूष समानत मुल्स रूजविण्यासाठी निर्माण केलेल्या सप्रेषण साहित्याचा वापर करून
- स्त्रीयांना प्राथमिक व उच्च शिक्षण देणे.
- स्त्रीयांना व्यवसायिक शिक्षण देणे.
- स्त्रीयांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे.
- शिक्षणातून स्वत:हाची आत्मबल वाढविणे.
- शिक्षणातून स्वत:हाची कार्यत्मक पातळीच्या शोध घेणे.
- स्त्रीयांना समाजात मानाचा दर्जा प्राप्त करून देणे.
- स्वत:हाच्या अस्थित्वाची ओळख करून देणे.
- समाजात मान समान मिळून देणे.
- समाजात स्त्रीने स्वत:हाची कार्यप्रणवता संधी करणे.
- अशा प्रकारे स्त्री पुरूषा समानता मुल्य रूजविण्यासाठी खालील उददीष्ट्र स्पष्ट करता येईल.

**संशोधनाची गृहीतके-**

1) विघार्थ्यांना स्त्री-पुरुष समानता मूल्याची गरज आणि त्याचा समाजाशी संबंध याबाबत पूर्वज्ञान आहे.
2) विद्यार्थ्यांना मूल्य या संकल्पना स्पष्ट आहेत.
3) संप्रेषण साहित्याचा वापर करून आशयाबाबत अधिक माहिती उपलब्ध करून देता येते.
4) विद्यार्थ्याचे स्त्री-पुरुष समानता मूल्याविषयीचे पूर्वज्ञान समान स्तरावर आहे.

**संशोधनाची अभ्युपगम-**

1) स्त्री पुरूष समानता मुल्य रूजविण्याकरता संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवून घेतलेली प्रश्नावली (मुले) घटक निम्न दिसून येईल.
2) स्त्री पुरूष समानता मुल्य रूजविण्याकरता संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवून घेतलेली प्रश्नावली (मुली) घटक निम्न दिसून येईल.

3) स्त्री पुरूष समानता मुल्य रूजविण्याकरता संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविल्यावर सोडवून घेतलेली प्रश्नावली (मुले) घटक उच्च दिसून येईल.
4) स्त्री पुरूष समानता मुल्य रूजविण्याकरता संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविल्यावर सोडवून घेतलेली प्रश्नावली (मुली) घटक उच्च दिसून येईल.

**संशोधन पदधती- प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे.**

जनसंख्या- प्रस्तुत संशोधनासाठी नगर शहरातील 4 केन्द्रातील माध्यमिक शाळेतील मुले व मुली

**न्यादर्श-**
संशोधकास उपलब्ध असणारा वेळ व पैसा, प्रतिसादाकांची उपलब्ध व माहिती मिळाल्यानंतर त्याचे करावे लागणारे पृथ्थकरण याचा आधी विचार करून न्यादर्शाचा आकार ठारवावा लागतो. संशोधन समऱ्या पडताळून पाहण्याच्या हेतूने स्त्री पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी संप्रेषण साहित्याची परिणाम कारकाता तपासण्यासाठी इ ९वी तील मुले व मुली ची नमुना म्हणून निवड करण्यात आली. नमुना गट निवडतांना आकस्मित/ सोयीस्कर नमुना चयन या पध्दतीचा वापर करण्यात आला. या नमुना गटाकडून प्रथम:तहा प्रश्नावली सोडवून घेण्यात आली व नंतर त्यांना चित्रफित दाखविण्यात आली व नंतर पुन्हा प्रश्नावली सोडवून घेण्याकरीता त्याकरिता शाळेची समंती घेतली व त्यानंतरच संबंधीत नमुना गटाकडून या प्रश्नावल्या सोडून घेतल्या. प्रस्तुत संशोधन करता इ ९वी तील मुले व मुली ची नमुना म्हणून निवड करण्यात आली त्यात चार शाळेत घेण्यात आली.

**नमुना चयन कोष्टक**

| क्रं | शाळा | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | केडगांव केन्द्रातील माध्यमिक शाळा | 30 | 30 | 60 |
| 2 | बुरुडगांव केन्द्रातील माध्यमिक शाळा | 30 | 30 | 60 |
| 3 | झेडीगेट केन्द्रातील माध्यमिक शाळा | 30 | 30 | 60 |
| 4 | रेल्वेस्टेशन केन्द्रातील माध्यमिक शाळा | 30 | 30 | 60 |
| **एकुण** | | 120 | 120 | 240 |

वरील 4 केन्द्रातील माध्यमिक शाळा इयत्ता 9 वी मधील प्रत्येक शाळेतील 30 मुले व 30 मुली यांची निवड ही प्रासंगीक नमुना निवड पध्दतीने केली.
संशोधन साधने- 1) प्रश्नावली 2) चित्रफित
संख्याशास्त्रीय साधने- t मुल्य

**संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही-**
सदर संशोधनामध्ये संशोधकांने मनपा क्षेत्रातील केन्द्रातील माध्यमिक शाळेत जाऊन मागील 2 वर्षांचा व सध्याचा अहवाल तपासून स्त्री - पुरूष समानते बाबत सद्यस्थितीचा आढावा घेण्यता आला व त्यांची नोंद ठेवण्यात आली.त्यानंतर संशोधनात संशोधकाने निवडलेल्या शाळेत जाऊन प्रथम मुख्याध्यापकांकडून परवानगी घेण्यात आली व त्यांच्याकडून विविध योजनांची माहिती घेण्यात आली. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यानकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली व नंतर चित्रफित दाखविण्यात आली. व नंतर पुन्हा प्रश्नावली सोडवून घेण्यात आली. वरील सर्व माहिती संकलित करून विश्लेषणात्क भाग सारणीच्या स्वरूपात मांडण्यात आला.

**संशोधन साधने**
**संशोधन साहित्याचा आदर्श व दिशादर्शक**
1. स्त्री- पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी समाजातील प्रसिदध असणाऱ्या स्त्रीची माहिती सदर संप्रेषण साहित्यामध्ये देण्यात आलेले आहे.
2. स्त्री- पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी समाजातील प्रसिदध असणाऱ्या स्त्रीची माहिती सदर्भात प्रशनावली व चित्रफितच्या मध्यमातून सदर संप्रेषण साहित्यामध्ये देण्यात आलेले आहे.

**संक्रियात्मक व्याख्या -**
अ) स्त्री पुरूष समानता तपासण्यासाठी ज्या संप्रेषण साहित्याव्दारे प्रयुक्ताने मिळवलेला प्रांप्ताक म्हणजे चित्रफित होय.
ब) स्त्री पुरूष समानता तपासण्यासाठी ज्या संप्रेषण साहित्याव्दारे प्रयुक्ताने मिळवलेला प्रांप्ताक म्हणजे प्रश्नावली होय.

### अ) चित्रफित-
प्रस्तुत चित्रफित मध्ये 10 समाजातील मान्यवर स्त्रीयावर आधारीत त्यांच्या जिवन कार्यावर केलेल्या कामकाजाची माहिती दिलेली आहे. विदयार्थ्यांना प्रश्नावली सोडण्यास दिली होती चित्रफित दाखविल्यावर पुन्हा तिच प्रश्नावली देण्यात येणार आहे.

**ब) प्रश्नावली-**

प्रस्तुत प्रश्नावली मध्ये 20 प्रश्न विचारण्यात आलेले आहेत हे प्रश्न समाजातील मान्यवर स्त्रीयावर आधारित आहेत.सदर प्रश्नावलीमध्ये प्रत्येक प्रश्नाच्या खाली चार पर्याय देण्यात आलेले आहेत. त्या पर्याय पैकी एक पर्याय निवडून प्रश्नाच्या समोरील चौकटीत योग्य उत्तराचा क्रंमाक नोदव्याचा आहे. अशाच प्रकारे प्रश्नावलीतील 20 प्रश्न सोडव्याची आहेत.

**गुणाकंन- या प्रश्नावलीचे गुणाकंन हे समान भार असणारे आहेत.यात 20 प्रश्न आहेत.**

| क्रं | तपशील | गुण |
|---|---|---|
| 1 | योग्य उत्तरास | 1 गुण |
| 2 | अयोग्य उत्तरास | 0 गुण |

**वरील तक्त्याप्रमाणे गुणाकंन केलेले आहे.**

**-: श्रेणीका वापरण्याची कृती:-**

संशोधनाकरता निवडलेल्या विषयाची पडताळणी करता विषयाला अनुसरून 1 प्रश्नावली तयार करण्यात आली. या प्रश्नावलीचा अवलंब इ 9 वी तील मुले व मुली यासाठी नमुना गटावर करण्यात आला. नमुना गट अहमदनगर शहरातील चार वेगवेगळया शाळेत इ.9वीच्या वर्गात घेण्यात आला. त्या करता आवश्यक ती परवानगी संमती पत्राव्दारे वेगवेगळया चारही ठिकाणी घेण्यात आली. नमुना गटात प्रत्येक शाळेत 30 मुले व 30 मुली एकुण 60 असे एकुण 240 प्रयुक्तावर प्रश्नावली घेण्यात आली. अशा प्रकारे 240 जणांची निवड आकस्मित/ सोयीस्कर पध्दतीव्दारे केली गेली.

नमुना गटातील इ 9वी च्या मुला मुलीना प्रश्नावली सोडविण्यास दिली. या प्रश्नावली सोडण्याकरता आवश्यक असणाऱ्या सुचना सर्व प्रथम दिल्या. त्या व्यवस्थतीत रित्या समजल्याची खात्री झाल्यानंतरच सोडण्यास सुरूवात करण्यास सागितले. प्रथम चाचणी संपूर्ण रित्या सोडवून झाल्यावर विद्यार्थीना चित्रफित दाखविण्यात आली. व पुन्हा तिच प्रश्नावली सोडविण्याकरता देउन सोडवून घेतली.

**संशोधनाची परिकल्पना-**

शून्य- स्त्री पुरूष समानतेविषयीचे आकलन आणि विकसीत करण्यात आलेली प्रश्नपेढी यांमध्ये माहिस्तीवर परपस्पर सहसंबंध नाही.

पर्यायी- स्त्री पुरूष समानतेविषयीचे आकलन आणि विकसीत करण्यात आलेली प्रश्नपेढी यांमध्ये माहिस्तीवर परपस्पर सहसंबंध आहे.

| प्रायोगिक आराखडा | | | |
|---|---|---|---|
| स्वतंत्रय परिवर्त्य | | **परतंत्र परिवर्त्य** | |
| मुले | मुली | प्रश्नावली | चित्रफित |

| परिवत्य | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्वतंत्र्य परिवर्त्य- | परतंत्र परिवर्त्य | | स्थिर परिवर्त्य | | |
| शाळेतील मुले व मुली | प्रश्नावली | चित्रफित | वय | लिंग | इयत्ता इत्यादी |

**प्रतिसाद / प्रत्याभरण**

| प्रेषक | संदेश | माध्यम | ग्राहक |
|---|---|---|---|
| (संशोधक) | स्त्री-पुरुष समानतेसाठी संप्रेषण साहित्य निर्मिती व परिणाम कारकतेचा अभ्यास करणे | चित्रफित | (इ.9 वी चे प्रायोगिक गटातील विदयार्थी) |

| संशोधनाची चले | | | |
|---|---|---|---|
| स्वाश्रयचल | | | आश्रयीचल- |
| पूर्वज्ञान | वय | अध्यापन पध्दती | आशयज्ञान |

**माहितीचे विश्लेषण-**

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकाने स्त्री- पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी संप्रेषण साहीत्याचे निर्मीती व परिणामकारकतेचा अभ्यास करणे हा विषय निवडला आहे. संबंधीत संशोधनाकरिता संशोधकाने विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, व चित्रफित या साधनांचा वापर केला आहे. त्यानंतर संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्याकरिता कोष्टक व शेकडेवारीचा वापर केला आहे.कोष्टकांचे अर्थनिर्वचन पुढीलप्रमाणे केले आहे. कोष्टकाचा क्रंमाक, कोष्टकाचे नांव, कोष्टातील पर्याय, प्रतिसादक शेकडेवारी.

कोष्टक स्त्री पुरूष समानता मुल्य रूजविण्याकरता संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी व चित्रफित दाखविल्यावर सोडवून घेतलेली प्रश्नावली (मुले) व (मुली) घटकावरील मध्यमान व प्रमाण विचलन आणि t मुल्य.

| घटक | माध्यमिक शाळा निवडलेले केंद्र | लिंग | एकुण नमुना चाचण्या | मुल्य स्वतंत्र्यता पातळी | चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवून घेतलेली प्रश्नावली | | | चित्रफितदाखविल्यावर सोडवून घेतलेली प्रश्नावली | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मध्य मान | प्रमाण विचलन | t | मध्य मान | प्रमाण विचलन | t |
| प्रश्नावली | केडगांव | मुले | 30 | 58 | 18.70 | 2.20 | 1.59 | 16.83 | 3.06 | 5.62 |
| | | मुली | 30 | | 24.96 | 1.72 | | 24.96 | 1.72 | |
| | बुरुडगांव | मुले | 30 | | 8.43 | 2.45 | 1.22 | 9.96 | 2.18 | 1.97 |
| | | मुली | 30 | | 12.9 | 1.72 | | 13 | 1.70 | |
| | झेंडीगेट | मुले | 30 | | 18.70 | 2.78 | 0.01 | 24.96 | 1.72 | 5.40 |
| | | मुली | 30 | | 22.51 | 3.47 | | 16.77 | 2.98 | |
| | रेल्वेस्टेशन | मुले | 30 | | 9.96 | 2.20 | 1.45 | 9.76 | 2.68 | 4.85 |
| | | मुली | 30 | | 12.56 | 2.50 | | 12.66 | 2.49 | |
| | एकुण | मुले | 120 | | 55.79 | 9.63 | 4.27 | 61.51 | 9.64 | 17.84 |
| | | मुली | 120 | | 72.93 | 9.41 | | 67.39 | 8.89 | |

(t **मुल्य हे** 0.01 **या पातळीला यथार्थ आहे.**)




**कोष्टकचे विवेचन –**

**केडगांव केन्द्रातील माध्यमिक शाळा –**

शाळेत शिकणारे प्रत्येकी 30 प्रमाणे असे एकुण 60 जणाच्या अंतर्भाव करण्यात आला. संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतल्या प्रश्नावली सोडवुन घेतली त्याबाबतीतील चित्रफित दाखविण्यापुर्वी यामध्ये मुले मध्य 18.70 तर प्रमाण विचलन 2.20 दिसून आले मुली मध्य 24.96 तर प्रमाण विचलन 1.72 दिसून आले. तसेच चित्रफित दाखविल्यावर सोडवून घेतलेली प्रश्नावली यामध्ये मुले मध्य 16.83 तर प्रमाण विचलन 3.06 दिसून आले मुली मध्य 24.96 तर प्रमाण विचलन 1.72 दिसून आले. तसेच मुल्य स्वतंत्र्यता पातळी 59 आहे व t मुल्य चित्रफित दाखविण्यापुर्वी 1.59 व चित्रफित दाखविल्यावर 5.62 आहे. त्यामुळे हे आलेले t मुल्य स्वतंत्रतेच्या दोन्ही पातळयाला विश्वसनीय आहे. अशा प्रकारे संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली ही चित्रफित दाखविल्यावर सोडवुन घेतलेल्या चाचणीत घटक उच्चतम दिसून आला आहे. (t मुल्य हे 0.01 या पातळीला यथार्थ आहे.)

**बुरुडगांव केन्द्रातील माध्यमिक शाळा –**

शाळेत शिकणारे प्रत्येकी 30 प्रमाणे असे एकुण 60 जणाच्या अंतर्भाव करण्यात आला. संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली सोडवुन घेतली त्याबाबतीतील चित्रफित दाखविण्यापुर्वी यामध्ये मुले मध्य 08.43 तर प्रमाण विचलन 2.45 दिसून आले मुली मध्य 12.09 तर प्रमाण विचलन 1.72 दिसून आले. तसेच चित्रफित दाखविल्यावर सोडवून घेतलेली प्रश्नावली यामध्ये मुले मध्य 09.96 तर प्रमाण विचलन 2.18 दिसून आले मुली मध्य 13.00 तर प्रमाण विचलन 1.72 दिसून आले. तसेच मुल्य स्वतंत्र्यता पातळी 59 आहे व t मुल्य चित्रफित दाखविण्यापुर्वी 1.22 व चित्रफित दाखविल्यावर 1.97 आहे. त्यामुळे हे आलेले t मुल्य स्वतंत्रतेच्या दोन्ही पातळयाला विश्वसनीय नाही. अशा प्रकारे संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली ही चित्रफित दाखविल्यावर सोडवुन घेतलेल्या चाचणीत घटक उच्चतम दिसून आला आहे. (t मुल्य हे 0.01 या पातळीला यथार्थ आहे.)

**झेडीगेट केन्द्रातील माध्यमिक शाळा -**

शाळेत शिकणारे प्रत्येकी 30 प्रमाणे असे एकुण 60 जणाच्या अंतर्भाव करण्यात आला. संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली सोडवुन घेतली त्याबाबतीतील चित्रफित दाखविण्यापुर्वी यामध्ये मुले मध्य 18.70 तर प्रमाण विचलन 2.78 दिसून आले मुली मध्य 22.51 तर प्रमाण विचलन 3.47 दिसून आले. तसेच चित्रफित दाखविल्यावर सोडवून घेतलेली प्रश्नावली यामध्ये मुले मध्य 24.96 तर प्रमाण विचलन 1.72 दिसून आले मुली मध्य 16.77 तर प्रमाण विचलन 2.98 दिसून आले. तसेच मुल्य स्वतंत्र्यता पातळी 59 आहे व t मुल्य चित्रफित दाखविण्यापुर्वी 0.01 व चित्रफित दाखविल्यावर 5.40 आहे. त्यामुळे हे आलेले t मुल्य स्वतंत्रतेच्या दोन्ही पातळयाला चित्रफित दाखविण्यापुर्वी 0.01 पातळयाला विश्वसनीय नाही व चित्रफित दाखविल्यावर 5.40 आहे विश्वसनीय आहे. अशा प्रकारे संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली ही चित्रफित दाखविल्यावर सोडवुन घेतलेल्या चाचणीत घटक उच्चतम दिसून आला आहे. (t मुल्य हे 0.01 या पातळीला यथार्थ आहे.)

**रेल्वेस्टेशन केन्द्रातील माध्यमिक शाळा -**

शाळेत शिकणारे प्रत्येकी 30 प्रमाणे असे एकुण 60 जणाच्या अंतर्भाव करण्यात आला. संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली सोडवुन घेतली त्याबाबतीतील चित्रफित दाखविण्यापुर्वी यामध्ये मुले मध्य 09.96 तर प्रमाण विचलन 2.20 दिसून आले मुली मध्य 12.56 तर प्रमाण विचलन 2.50 दिसून आले. तसेच चित्रफित दाखविल्यावर सोडवून घेतलेली प्रश्नावली यामध्ये मुले मध्य 09.76 तर प्रमाण विचलन 2.68 दिसून आले मुली मध्य 12.66 तर प्रमाण विचलन 2.49 दिसून आले. तसेच मुल्य स्वतंत्र्यता पातळी 59 आहे व t मुल्य चित्रफित दाखविण्यापुर्वी 1.45 व चित्रफित दाखविल्यावर 4.85 आहे. त्यामुळे हे आलेले t मुल्य स्वतंत्रतेच्या दोन्ही पातळयाला चित्रफित दाखविण्यापुर्वी 1.45 पातळयाला विश्वसनीय नाही व चित्रफित दाखविल्यावर 4.85 आहे विश्वसनीय आहे. अशा प्रकारे संप्रेषण साहित्य चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली ही चित्रफित दाखविल्यावर सोडवुन घेतलेल्या चाचणीत घटक उच्चतम दिसून आला आहे. (t मुल्य हे 0.01 या पातळीला यथार्थ आहे.)

**परिकल्पनेची सत्यता-**

प्रस्तुत संशोधनामध्ये t मुल्य या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करून निष्कर्ष काढण्यात आले असून त्यानुसार अभ्युपगम सिदध झाल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी शून्य परिकल्पना मांडण्यात आलेली असून शून्य परिकलपनेचा स्वीकार करावा लागेल.

**अर्थ नियोजन-**

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य हेतु मध्ये स्त्री पुरूष समानता मुल्य रूजविण्याकरता संप्रेषण साहित्याची निर्मिती व परिणाम कारकतेचा अभ्यास करणे ही समऱ्या पडताळुन पाहणे यासाठी प्रश्नावली वापरल्या होत्या यामध्ये चित्रफित दाखविण्यापुर्वी व चित्रफित दाखविलयावर सदरची प्रश्नावली मुले व मुली याच्याकडुन 4 केन्द्रातील माध्यमिक विद्यालयात 30 मुले व 30 मुली याप्रमाणे प्रत्येक शाळेत 60 याप्रमाणे 120 मुले व 120 मुली अशा एकुण 240 विदयार्थ्यावर प्रश्नावली सोडवून घेण्यात आली. प्रस्तुत संशोधनातील समऱ्या पडताळणी हेतूने अहमदनगर शहरातील वेगवेगळया शाळेतील विविध शाळेतील मुले व मुली यांना प्रश्नावली देण्यात आली यामध्ये 240 विद्यार्थ्यांना चित्रफित दाखविण्यापुर्वी व

दाखविल्यावर तीच प्रश्नावली पुन्हा सोडवुन घेण्यात आली. या प्रश्नावलीसाठी इयत्ता ९ च्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात आली त्यानंतर प्रश्नावलीचे गुणाकंन केले. दोन्ही प्रश्नावलीचे कच्चे प्राप्तांक स्तरानुसार लिहले. त्यानंतर वर्णनात्मक संख्याशास्त्राचा अवलंब करून मध्ये प्रमाण विचलन स्वतंत्रता पातळी मुल्य t मुल्य काढण्यात आले व आलल्या मुल्याव्दारे अनुमानात्मक संख्याशास्त्राचा वापर करून निष्कर्ष काढण्यात आले.

**निष्कर्ष-**

1. चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली फक्त मुलाची सोडवुन घेतलेल्या चाचणीत घटक निम्नतम दिसून आला आहे.
2. चित्रफित दाखविण्यापुर्वी सोडवुन घेतलेल्या प्रश्नावली फक्त मुलाची सोडवुन घेतलेल्या चाचणीत घटक निम्नतम दिसून आला आहे.

**शिफारस:-**

1. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी पाठयक्रमात जास्त पाठयभार अंश वाढविणे.
2. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी टी.व्ही वर विविध कार्यक्रम सुरू करणे.
3. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी मूल्य शिक्षणाचे तास वाढविणे.
4. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी विविध साहित्याची निर्मिती करणे.
5. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी विभागीय स्तरावर समिती नेमण्यात यावी.

शिक्षक- स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी शिक्षकांनी विविध द्रक श्राव्य साधनाचा वापर करणे
तसेच पाठक्रमातून विविध उदाहरणे देणे.

**विदयार्थी- स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी समाजमान्य स्त्रीचांचा अभ्यास करणे.**

**समाज-**

1. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी पाठयक्रमात जास्त पाठयभार अंश वाढविणे.
2. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी टी.व्ही वर विविध कार्यक्रम सुरू करणे.
3. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी मूल्य शिक्षणाचे तास वाढविणे.

**शासन-**

1. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी विविध साहित्याची निर्मिती करणे.
2. स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी विभागीय स्तरावर समिती नेमण्यात यावी.

**संशोधनाची मर्यादा-**

1) प्रस्तुत संशोधनासाठी नमुना चयन हे फक्त अहमदनगर शहरातील निवडण्यात आले होते.
2) प्रस्तुत संशोधनात इयत्ता ९ वी तील मुले व मुले यांचा समावेश करण्यात आला.
3) संशोधना करता नमुना गट 30/30 घेण्यात आला होता.
4) या संशोधनात फक्त इयत्ता ९ वी तील विद्यार्थीच घेण्यात आले.
5) या संशोधनातील समऱ्या विधानाविषयी नव्याने पुर्ण संशोधन करणे गरजेचे आहे.
6) प्रस्तुत संशोधनात नमुना गट आकस्मित व सोयीस्कर पध्दतीने निवडण्यात आला.

**संशोधनाचे उपायोजन**

**प्रस्तुत संशोधनाचा उपयोग पुढील क्षेत्रात होवू शकतो.**

1. शैक्षणीक क्षेत्रात
2. चिकित्सालयीन क्षेत्रात
3. समुपदेशन क्षेत्रात
4. संशोधन क्षेत्रात

**उपसंहार-**

स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी संप्रेषण साहित्याची निर्मिती व परिणामकारकतेचा अभ्यास करणे यामध्ये स्त्री-पुरूष समानते मूल्यमापन यापूर्वी झालेले आहे. प्रस्तुत संशोधनात आलेले निष्कर्ष हे जवळपास संशोधनाच्या निष्कर्षासारखेच आहेत. संबंधितांच्या अडचणी व सूचना यातही साम्य असल्याचे दिसून येते.

**समारोप-**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाला स्त्री-पुरूष समानता मूल्य रूजविण्यासाठी संप्रेषण साहित्याची निर्मिती व परिणामकारकता दिसून आलेली आहे. शासनाने व शालेय शिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक महामंडळ पुणे यांनी देखील जास्तीत जास्त सहशालेय अभ्यासक्रमात जास्तीत जास्त वापर करावा व सदर च्या संशोधनामुळे ही विद्यार्थी, समाज, पालक,यामध्ये स्त्री-पुरूष

समानता मूल्य रूजविण्यासाठी सदर संशोधनाचा वापर होईल.

**संदर्भग्रंथ सूची**


1. भिंताडे वि. रा. (मार्च 2009) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे-नूतन प्रकाशन
2. मुळे रा. शं आणि उमाठे वि. तु.(1998) शैक्षणीक संशोधनाची मूलतत्वे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, पृ.क्र. 191 ते 216
3. श्रीधर साळुंके (2010) पाठयपुस्तके व इतर शैक्षणीक साधने, जीवन शिक्षण. मसुदा विशेषांक- पृ.क्रं.60
4. सुषमा प्रमोद पाटील (2010) जीवन शिक्षण आश्रमशाळेच्या कुमार अवस्थेतील विद्यार्थीनींची स्थगन व गळती.
5. डॉ. किशोर चव्हाण (2010) शिक्षणाचा हक्क कायदा, शिक्षण तरंग सप्टेंबर-ऑक्टोबर-2010 पृष्ठ क्रं.6
6. गोविंद पानसरे (2010) व्दि-वर्ण शिक्षण व्यवस्था मुंबई- भारती प्रकाशन.
7. कुन्हा भोसले (1916) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण समस्या नाशिक- नित्यनूतन प्रकाशन.
8. पंडीत बन्सी बिहारी (1989) शिक्षणातील कृती संशोधन नूतन प्रकाशन, पुणे.- प्रकरण 1
9. देशपांडे- के. ना. माळी, आ. ल. (2006) भारतीय शिक्षणाचा इतिहास नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
10. आगलावे प्रदिप (2000) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर.
11. घोरमोडे के. यू. आणि घोरमोडे कला (2008) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, विद्या प्रकाशन, नागपूर.
12. देशपांडे प्रकाश आणि पाटोळे एन. के. (2007) संशोधन पध्दती यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
13. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संशोधनाची पुष्प 1 ते 15 (2013)